**पंतप्रधानाची कुवेतचे महामहिम अमीर यांच्या निमंत्रणावरुन अरेबियन गल्फ कप स्पर्धेला 'गेस्ट ऑफ ऑनर' म्हणून उपस्थिती**

21 डिसेंबर 2024

कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी कुवेतमधील 26 व्या अरेबियन गल्फ कपच्या उद्घाटन समारंभाला 'गेस्ट ऑफ ऑनर' म्हणून उपस्थित होते. नेत्रदीपक उद्घाटन समारंभाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे महामहिम अमीर, महामहिम राजपूत्र आणि कुवेतचे महामहिम पंतप्रधान यांच्यासोबत साक्षीदार ठरले. या समारंभाच्या निमित्ताने कुवेतच्या नेतृत्वासोबत पंतप्रधानांनी अनौपचारिक संवाद साधला.

2. कुवेतने यंदा द्विवार्षिक अरेबियन गल्फ कपचे यजमान पद स्विकारले आहे. GCC राष्ट्रे, इराक आणि येमेन सहित आठ देशांचा स्पर्धेत सहभाग आहे. ही फूटबॉल स्पर्धा या प्रदेशातील क्रीडा स्पर्धात अत्यंत प्रतिष्ठेची मानली जातात. कुवेतने सहभागी देशांपैकी सर्वाधिक वेळा स्पर्धेवर आपलं नाव कोरलं आहे. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी सर्व सहभागी देशांच्या संघांना शुभेच्छा दिल्या.

कुवेत सिटी

21 डिसेंबर 2024